**आर/बी आय / २००४-०५/२१३**
सी.ओ. डी.टी. नं. १५.०२.००१/एच ३४८४-३५२०/२००४-०५

ऑक्टोबर ७, २००४
अश्विन १५, १९२६ (स)

अध्यक्ष/कार्यकारी संचालक
भारतीय स्टेट बँक / संबंधित बँका,
१५ पब्लिक सेक्टर बँका,

प्रिय महोदय,
**सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे द्वारे ज्येष्ठ नागरिकांची खाती चालविण्यासाठी योजना, २००४ (एस सी एस एस)**

आपल्याला माहितच आहे की पोस्ट ऑफिस द्वारा दि. २ ऑगस्ट २००४ पासून जी. एस. आर ४९० (इ) चे सरकारी प्रसिद्धी पत्रकानुसार सरकारने ज्येष्ठ नागरीकांसाठी बचत खाते ही योजना, २ ऑगस्ट २००४ पासून सुरु केली आहे. ज्या सार्वजनिक क्षेत्रातील बँका पी पी एफ योजना १९६८ (ऑफिस मेमो नं. २-८/२००४) एन एस – २ दि. ३० सप्टेंबर २००४) चालवित आहेत, अशा बँकांनी वरील योजनेचा (ज्येष्ठ नागरीक बचत खाते योजना २००४) वापर करावा असे भारत सरकारने ठरविले आहे. सदरच्या एजंसी बँकानी या **योजनेचा वापर हा, पी पी एफ योजना १९६८** चे धर्तीवर करायचा आहे. आपल्या माहितीसाठी व पुढील कृती साठी आम्ही दि. २.८.२००४ चे प्रसिद्धी पत्र व कार्यालय यादी दि. ३०.९.२००४ च्या १० प्रती पाठविल आहोत

२. दिनांक ३०.८.२००४ च्या कार्यालयीन यादीनुसार, भारत सरकारने योजनेचा उपयोग करण्या साठी खालील गोष्टींचा उपयोग करावा असे सुचविले आहे.

अ) स्टँडर्डाईज्ड् एजंसी योजने अंतर्गत (एस.ए.एस) छोटे बचत दलाल या योजने खाली ठेवी ठेवतील त्यांना ठेवीच्या अर्धाटक्का इतके कमिशन मिळेल. ज्येष्ठ नागरीकांच्या या योजनेसाठी जे दलाल काम करीत आहेत, व जे पी. पी. एफ योजने साठी ही दलाल म्हणून काम करीत आहेत, त्यांना कार्यालयीन पत्रक नं. १८/५/९९-एन. एस. II दिनांक १० फेब्रुवारी २००४ व २० मे २००४, भारत सरकार, आर्थिक व्यवहार, अर्थखाते यांचे प्रमाणे कमिशन देण्यात येईल. येथे हे नमूद केले पाहिजे की एस. ए. एस. दलाल हे निवृत्त कामगारांच्या ठेव योजने अंतर्गत ठेवी स्विकारत असत.

ब) या योजनेसाठी आवश्यक असलेल्या खात्यासंबंधी हा तपशील लिहीण्याबाबत अजून ठोस निर्णय झालेला नाही. दरम्यानचे काळात सदर योजनेचे व्यवहार हे खाली नमूदकेल्या प्रमाणे होतील

१) **मुद्दलाची रक्कम ठेवणे आणि ती काढणे :** मुख्य शीर्षक : ८००१-राष्ट्रीय बचत ठेवी : ००-१०३ कायमस्वरुपी आणि मुदत ठेवी.

२) **ठेवीदारास व्याजाची रक्कम देणे :** मुख्य शीर्षक : ८००८-आय आणि खर्च राष्ट्रीय अल्प बचत फंड : ०२ - ठेवीदारांना द्यावयाची व्याजाची रक्कम : १०१-राष्ट्रीय बचत ठेवी वरील व्याज.

३) **दलालांना द्यावयाची अडत :** मुख्य शीर्षक : ८००८ - राष्ट्रीय अल्प बचतीचे आय आणि खर्च फंड : ०३-कार्यकारी खर्च १०३-दलालांना द्यावयाची अडतः०२ बँकाकडून देण्यात येणारी अडत : ०१-एस ए एस दलालांना देण्यात येणारी अडत : ५० - इतर खर्च

क) एस. सी. एस. एस २००४ च्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती स्टेशनरी आणि इतर गोष्टी आपल्या सर्व शाखांना देणे बाबत आपणास सूचित केले जात आहे. एस.सी.एस एस योजना २००४ ची कारवाई व अंमलबजावणी यशस्वी रीत्या होण्यासाठी आम्ही आपणास असे सूचित करतो की यासाठी योग्य ती ठोस योजना, शक्यतितक्या लवकर केली जावी कारण, १.११.२००४ पूर्वी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधे याचा प्रसार व्हावा यासाठी भारत सरकार सर्वतोवरी प्रयत्नशील आहे.

३) आपल्या माहितीसाठी व योग्य त्या कारवाई साठी आम्ही आपणास **परिपत्रक १** ज्या मध्ये सार्वजनिक बँकांची खाती कशी कार्यरत करायची आहेत त्याची पद्धती व त्या बाबतचा अहवाल पाठविण्या संबंधी माहिती पाठवित आहोत. या **परिपत्रक** २ मध्ये एस.सी.एस.एस. २००४ च्या मुख्य उद्देशांचाहि समावेश आहे.

४) यासाठी आपण आपल्या संबंधित विभागीय / इतर शाखांना, त्यासंबंधी योग्यता सूचना द्याव्यात असे आम्ही आपणांस या पत्राद्वारे सूचित करत आहोत. तसेच १ नोव्हेंबर २००४ चे पूर्वी लवकरात लवकर एस सी एस एस – २००४ च्या योजने अंतर्गत ठेवी स्विकारण्यास सुरुवात करणेबाबत सूचना दिल्या जाव्यात.

५) कृपया पत्राची पोच जरुर द्यावी.

आपला विश्वासू<br>
बी बी संगमा<br>
महा व्यवस्थापक

(वर नमूद केल्या प्रमाणे)

परिशिष्ट १

**ज्येष्ठ नागरीकांची बचत योजना, २००४**

१) सहभागी बँका :- सार्वजनिक क्षेत्रातील ज्या बँका पी. पी. एफ. योजना १८६८, चे काम पाहत आहेत त्या सर्व बँका ही योजना राबवतील असे ठरविण्यात आले आहे.

२) फंडातील रक्कम दुसऱ्या खात्यात जमा करणे व त्याचा अहवालः

अ) एस सी एस एस – २००४ या योजने अंतर्गत जमा होणारी रक्कम, सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका, त्यांच्या संबंधित अशा, नागपूर येथील बँकेत, दररोज, केंद्रीय सरकारी खाते विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक नागपूर येथे सरकारी खात्यांत जमा करतील. सध्या अस्तित्वात असलेल्या पद्धतीनुसार ३ दिवसांनंतर रकमेचा सरकारी खात्यामधे भरणा केल्यास त्यासाठी दंड भरावा लागेल.

ब) दलाल बँकांनी अहवाल खालील योजनेनुसार द्यावयाचा आहेः-

१) भारतीय स्टेट बँकेच्या ज्या शाखा एस. सी. एस. एस. — २००४ योजनेचे व्यवहार पाहात आहेत, त्या संबंधित शाखा, जी ए डी, नवी मुंबई, येथे अहवाल सादर करतील. फंडाच्या सेटलमेंटसाठी भारतीय स्टेट बँक, जीएडी, नवी मुंबई सर्व अहवाल / प्रति शाखा, आणि प्रतिराज्य, असे एकत्र करुन सी ए एस नागपूर येथे पाठवतील.

या संबंधीचे अंतिम रेकोर्ड आणि एस. सी. एस. एस. — २००४ च्या संबंधातील व्यवहारा संबंधी माहिती आपणास मध्यवर्ती खाते नागपूर येथे मिळू शकेल.

२) एस. सी. एस. एस. — २००४ च्या व्यवहारासंबधी संबधित सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच्या शाखा थेट किंवा त्यांच्या उपशाखांद्वारे अहवाल नागपूर येथे सादर करू शकतील.

३) सर्व संबधित बँका, त्यांच्या उपशाखा आणि सार्वजनिक क्षेत्रातील नागपूर येथील शाखा एस. सी. एस. एस. — २००४, सर्व अहवाल एकत्र करुन त्याचा प्रतिराज्य व प्रतिशाखा अहवाल दररोज, सी ए एस नागपूर येथे सादर करतील. आणि थेट सी ए एस नागपूर येथे निधीची हिशेबपूर्ती करतील. अंतिम नोंदी आणि एस. सी. एस. एस. — २००४ चे व्यवहारा संबंधी माहिती, मध्यवर्ती खाते नागपूर येथून आपणास मिळू शकेल.

४) जिल्हा पातळीवरील भारतीय स्टेट बँकेच्या उपशाखा, इतर बँका आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँका यांचे कडील अहवाल स्विकारणार नाहीत व एस. सी. एस. एस. — २००४ व्यवहाराच्या निधीची हिशेबपूर्ती करणार नाहीत.

५) भारतीय रिझर्व्ह बँकेची अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, कोलकता, गोहाट्टी, हैदराबाद, जयपूर, कानपूर, चेन्नाई, मुंबई, नागपूर, नवी दिल्ली आणि पटना तिरुअनंतपूरम येथील कार्यालये, एस. सी. एस. एस. — २००४ च्या व्यवहारासंबंधी संबंधित बँका व सार्वजनिक बँकांचे अहवाल स्वीकारणार नाहीत.

३) दलाल बँकांच्या साखळी बँका, ज्या नागपूर / एस बी आय नवी मुंबई येथे आहेत त्यांनी त्यांचे दरमहाचे निवेदन मुख्य लेखा अधिकारी, आर्थिक व्यवहार विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, आणि या खात्यास ज्या महिन्याचे निवेदन आहे त्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सादर करतील.

परिशिष्ट II

ज्येष्ठ नागरीकांसाठी बचत योजना २००४
योजनेचा कालावधीः
५ वर्ष जो अधिक ३ वर्षांपर्यंत वाढू शकतो.

व्याज दर दर साल ९%
व्याजाचा हिशेब करण्याची वारंवारता — दर ३ महिन्यांनी

करपद्धती - संपूर्णपणे करपात्र
गुंतवणुक रु. १००० च्या पटीत

गुंतवणुकीची कमाल मर्यादा - रुपये १५ लाख

अर्हतेची किमान वयोमर्यादा — ६० वर्षे
(स्व- खूषीने किंवा विशेष स्वेच्छानिवृत्ती घेतल्यास — ५५ वर्षे)

खात्यातून मुदतपूर्व रक्कम काढण्याची सुविधा :
रक्कम गुंतविल्या पासून १ वर्षांनंतर, परंतु दंडासह

हस्तांतरण करणे बाबत : सुविधा उपलब्ध नाही

विनिमय क्षमता (ट्रेडेबिलीटी) : उपलब्ध नाही

नामानिर्देशन : उपलब्ध आहे.

धारणा करण्याची रीत : सर्वसाधारणपणे एकच संयुक्त खात्यास अनुमती आहे परंतु त्यासाठी पति-पत्नींचे लाभार्थींसह संयुक्त खाते असावे.

फॉर्म्सची उपलब्धताः
पोस्ट ऑफीस आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँका व त्यांच्या शाख्या यांचेकडे उपलब्ध